**कोकण विभागातील मच्छिमार व मच्छिमार संस्थेच्या सभासदांना विशेष पॅकेज अंतर्गत सानुग्रह अनुदान मंजूर करणे.**

**महाराष्ट्र शासन**
**कृषि,पशुसंवर्धन,दुग्धव्यवसाय विकास व मत्स्यव्यवसाय विभाग,**
**शासन निर्णय क्रमांकःमत्स्यवि-१००८/प्र.क्र.९१/पदुम-१४,**
**मंत्रालय विस्तार,मुंबई-४०००३२.**
**दिनांकः-७ ऑगस्ट,२००८.**

## प्रस्तावना

कोकणातील मच्छिमारांनकरिता विशेष पॅकेज अंतर्गत सानुग्रह अनुदानापोटी रु३१,५६,२६,०००/- इतकी रक्कम मंजूर करण्याचा निर्णय शासनाने घेतला आहे. त्यानुसार रु.२०,००,०००/- इतके सानुग्रह अनुदान शासनाच्या वरील संदर्भाधीन क्र.५ जुलै,२००८ च्या शासन निर्णयान्वये आकस्मिकता निधीतून उपलब्ध करुन देण्यात आलेले आहे. आकस्मिकता निधीतून रु.२०,००,०००/- इतक्या निधीची प्रतिपूर्ती करण्यासाठी व उर्वरित रु.११,५६,२६,०००/- अशा एकूण रु.३१,५६,२६,०००/- इतक्या रकमेची तरतूद करण्याकरिता पूरक मागणीचा प्रस्ताव सन २००८ च्या पावसाळी अधिवेशनात सादर करण्यात आला होता. महाराष्ट्र (द्वितीय पुरवणी) विनियोजन अधिनियम २००८ (सन २००८ चा महाराष्ट्र अधिनियम क्र.२५) शासन राजपत्रात प्रसिध्द करण्यात आल्याने पुरवणी मागणीद्वारे करण्यात आलेली तरतूद वितरीत बाब शासनाच्या विचाराधीन होती.

## शासन निर्णयः-

मच्छिमारांना सानुग्रह अनुदानापोटी मंजूर केलेल्या रु.३१,५६,२६,०००/- रकमेपैकी रु.२०,००,०००/- इतकी रक्कम आकस्मिकता निधीतून यापूर्वीच मंजूर करण्यात आलेली आहे. यासंबंधीचा पुरवणी विनियोजन अधिनियम,२००८ पारित झालेला असल्यामुळे सदर रक्कम आता आकस्मिकता निधीच्या खाली खर्ची न टाकता विभागाच्या खालील लेखाशिर्षाखाली खर्ची टाकावी. तसेच उर्वरित आवश्यक असलेली रु.११,५६,२६,०००/- इतकी रककम या शासन निर्णयान्वये खर्च करण्यास वितरित करण्यात येत आहे. सदर रक्कम संबंधीत लाभार्थीना तात्काळ वाटप करण्याबाबतची कार्यवाही आयुक्त, मत्स्यव्यवसाय यांनी त्वरीत करावी.

या बाबीवर होणारा खर्च हा खालील लेखाशिर्षांतर्गत उपलब्ध तरतुदीच्या मर्यादेत करण्यात यावाः-

मागणी क्र.डी-६
२४०५-मत्स्यव्यवसाय
(००) (८००)-इतर खर्च
(०२) (०६)-मच्छिमारी साधने (योजनेत्तर) (२५०५-४७९-६)
३१-सहाय्यक अनुदाने (वेतनेत्तर)

या विशेष पॅकेज अंतर्गत कार्यक्रमाची अंमलबजावणी करण्यासाठी पर्यवेक्षक अधिकारी म्हणून प्रादेशिक उपआयुक्त मत्स्यव्यवसाय, मुंबई व नियंत्रण अधिकारी म्हणून आयुक्त,मत्स्यव्यवसाय,मुंबई हे राहतील. तसेच या आकस्मिक अंमलबजावणी करताना अनुदान वाटप व्यवस्थितपणे होईल याची दक्षता घेण्यात यावी. तसेच आकस्मिक निधीतून उपलब्ध झालेले अग्रिम रु.२०,००,००,०००/- तसेच या शासन निर्णयाद्वारे मंजूर केलेला निधी रु.११,५६,२६,०००/- असा एकूण निधी रु.३१,५६,२६,०००/- च्या मर्यादेत पूर्णतः खर्च करण्याची जबाबदारी आयुक्त,मत्स्यव्यवसाय कार्यालयाची राहील. आयुक्त,मत्स्यव्यवसाय,मुंबई यांनी मंजूर अनुदानातून प्रत्यक्ष खर्च केल्याची बाबनिहाय एकत्रित माहिती कृषि व पदुम विभागास व वित्त विभागा यांना पाठवावी.

हा शासन निर्णय वित्त विभागाच्या सहमतीने व वित्त विभागाच्या अनौपचारिक संदर्भ क्र.२२९/०८/व्यय-१,दि.६/८/२००८ अन्वये निर्गमित करण्यात येत आहे.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संगणक संकेतांक २००८०८०७१०५००१००१ असा आहे.

महराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

(म.ह.सोनकुसरे),
उपसचिव,महाराष्ट्र शासन
कृषि,पशुसंवर्धन,दुग्धव्यवसाय विकास व मत्स्यव्यवसाय विभाग,

प्रति,
आयुक्त,मत्स्यव्यवसाय,महाराष्ट्र राज्य,मुंबई-५१.(५ प्रती)
संचालक,अर्थ व सांख्यिकी संचालनालय,मुंबई
प्रादेशिक उपआयुक्त मत्स्यव्यवसाय,मुंबई

सहसंचालक,लेखा व कोषागारे,संगणक कक्ष,नवीन प्रशासकीय भवन,५ वा मजला,मुंबई (२ प्रती)
सहाय्यक आयुक्त मत्स्यव्यवसाय,मुंबई/ठाणे/अलिबाग/रत्नागिरी/सिंधुदुर्ग/(प्रत्येकी २ प्रती)
महालेखापाल,महाराष्ट्र-१/२(लेखा परिक्षा)/(लेखा व अनुज्ञेयता),मुंबई/नागपूर
अधिदान व लेखा अधिकारी,मुंबई
निवासी लेखा परिक्षा अधिकारी,मुंबई
लेखा अधिकारी,आयुक्त,मत्स्यव्यवसाय यांचे कार्यालय,मुंबई
जिल्हा कोषागार अधिकारी,ठाणे/रायगड (अलिबाग)/रत्नागिरी/सिंधुदुर्ग
उप कोषागार अधिकारी,पालघर(ठाणे),मालवण(सिंधुदुर्ग)
वित्त विभाग (व्यय-१)/(अर्थसंकल्प-३)/(अर्थसंकल्प/अर्थोपाय),मंत्रालय

प्रत,

मा.मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव,मुख्यमंत्र्यांचे सचिवालय,मुंबई-४०००३२.
सहसचिव,मुख्य सचिव यांचे कार्यालय,मंत्रालय,मुंबई
मा.मंत्री (मत्स्यव्यवसाय) यांचे खाजगी सचिव,मंत्रालय,मुंबई-३२.
मा.मंत्री (वित्त/नियोजन) यांचे खाजगी सचिव,मंत्रालय,मुंबई-३२.
मा.राज्यमंत्री (मत्स्यव्यवसाय) यांचे खाजगी सचिव,मंत्रालय,मुंबई-३२.
कार्यासन अधिकारी,पदुम-१२,पदु-१३,पदुम-१६,कृषि व पदुम विभाग,मंत्रालय,मुंबई
निवड नस्ती